# ‘‘विदर्भाच्या स्वातंत्र्य चळवळीतील राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचे योगदान ’’

# “Vidharbhachya Swatantrya Chalvalitil Rashtrasant Shree Tukdoji Maharajanche Yogdan “

## लघुशोध प्रबंध गोषवारा

## (Executive Summary of Minor Research Project)


**योगेश खेमराज भोयर**

सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग

न.मा.द. महाविद्यालय, गोंदिया

yogesh85bhoyar@gmail.com

**Executive Summary of Minor Research Project**

**(लघुशोध प्रबंघ गोषवारा)**

**"विदर्भाच्या स्वातंत्र्य चळवळीतील वंदनीय राष्ट्रसंत**

**श्री तुकडोजी महाराजांचे योगदान"**

स्वातंत्र्यापुर्वी भारत हा ब्रिटीशांच्या गुलामगिरीत होता. ब्रिटीशांनी आपल्या १५० वर्षाच्या शासनकाळात भारतीय जनतेचे शोषण केले. यामुळे ब्रिटीशांच्या तावडीतून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे कार्य भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांसह महात्मा गांधीजींनी ही प्रदीर्घपणे हाती घेतले. ब्रिटीशसत्ते विरोधात भारतात जोरदार लढा सुरु असताना त्याचे लोण महाराष्ट्रातही पोहोचले. या स्वातंत्र्य प्राप्तीच्या कार्यात विदर्भीय जनता सुद्धा तेवढयाच हिरिरीने सहभागी झाली. मात्र या विदर्भीय जनतेत स्वातंत्र्य आंदोलनाची व देशसेवेची पाळेमुळे रुजविण्यात वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजानी अतिशय मोलाची कामगिरी बजाविली. महात्मा गांधीचा वास्तव्य विदर्भात वर्धा येथील सेवाग्राम आश्रमात असतांना तुकडोजी महाराजांचा त्यांचाशी संपर्क आला व तुकडोजींनी देशसेवा हीच खरी देवसेवा स मजून स्वतःला या देशसेवेच्या कार्यात वाहून घेतले व विदर्भातील सर्वत्र परिसर पिजून काढीत ब्रिटीशांचे खरे रुप जनतेसमोर मांडले. यामुळे विदर्भीय जनता ब्रिटीशसत्ते विरोधात पेटून उठली व यातूनच १९४२ साली विदर्भात चिमूर, आष्टी व यावली येथे स्वातंत्र्य संग्राम घडुन आला. यामागे राष्ट्रसंताची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. या अनुषंगाने विदर्भात झालेल्या स्वातंत्र्य चळवळीतील वंदनीय  राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या कार्याचे अध्ययन करण्याचा प्रयत्न प्रस्तूत लघुशोध प्रबंधात करण्यात आला आहे.

**प्रकरण १ : प्रस्तावना**

राष्ट्रसंत तुकडोजी हे एक विदेही संत होते. प्रस्तूत प्रकरणात राष्ट्रसंतांनी सर्वसामान्य जनतेला आत्मोध्दाराचा व सामाजिक विकासाचा जो मार्ग दाखविला त्याचे अध्ययन करण्यात आले आहे. समाज आजच्या घडीला सुध्दा अंधश्रद्धेच्या तावडीतून पूर्णपणे सुटलेला नाही. त्या बरोबरच सामाजिक विषमता, सांप्रदायिक द्वेष, जातीयता

अहिष्णुतेचे वातावरण आजही समाजात आढळते. यावर राष्ट्रसंतानी सामाजिक व राष्ट्रीय एकोपा निर्माण होण्यासंबंधी जे विचार मांडले त्याचे अध्ययन करण्यात आले आहे.

**प्रकरण २ : राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा संक्षिप्त जीवन वृत्तांत**

प्रस्तूत प्रकरणात राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचा जीवन परिचयाचा आढावा संक्षिप्त स्वरुपात घेण्यात आला आहे. आर्थिक परिस्थिती अनुकूल नसतांनाही प्राथमिक शिक्षण कसेबसे पूर्ण करुन देखील समाजविकासाची जी वैचारिक पातळी तयांच्या मनात रुजली व यामुळे त्यांच्या हातून समाजविकास ग्रामविकास व राष्ट्रविकासाचे कार्य पूर्ण होऊ शकले याचे अध्ययन सदर प्रकरणात करण्यात आले आहे.

**प्रकरण ३ : राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचा विदर्भातील स्वातंत्र्य चळवळीत प्रवेश**

प्रस्तूत प्रकरणात राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या राजकीय चळवळीच्या पदार्पणाचे अध्ययन करण्यात आले आहे. तुकडोजी महाराजांच्या प्रारंभीच्या कारकिर्दीत भजन-किर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्यावर भर आढळतो. मात्र पुढे नागपूर येथील काँग्रेसच्या अधिवेशनानंतर व महात्मा गांधीच्या प्रत्यक्ष संपर्कामुळे तुकडोजींच्या जीवनकार्याला कलाटणी येते व ते देशसेवेच्या कार्याकरीता स्वतःला वाहून घेण्याचे प्रण घेतात.

**प्रकरण ४ : चिमूरचा स्वातंत्र्य संग्राम**

प्रस्तूत प्रकरणामध्ये राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या राजकीय प्रबोधनाच्या कार्याचे सविस्तर अध्ययन करण्यात आले आहे. १९४२ साली संपूर्ण भारतात ब्रिटीशांविरुद्ध चले जाव आंदोलन सुरु झाल्यानंतर विदर्भातील चिमूर मधील जनतेला सुद्धा या उठावात सर्व शक्तीनीशी सहभागी होण्यासाठी तुकडोजी महाराजांनी चिमूर मध्ये जी आवेशात्मक भजने म्हटली तसेच त्यांच्या प्रबोधनातून चिमूर मध्ये जो स्वातंत्र्य संग्राम घडुन आला याचे अध्ययन करण्यात आले आहे.

## प्रकरण ५ : आष्टीचा स्वातंत्र्य संग्राम

प्रस्तूत प्रकरणामध्ये विदर्भातील आष्टीतील जनतेत तुकडोजी महाराजांनी जो राष्ट्रप्रेम व ब्रिटीशांविरुद्ध संघर्षाची भावना निर्माण केली त्याचे अध्ययन करण्यात आले आहे. १९२८ पासूनच आष्टीतील जनतेत ब्रिटीशांविरुद्ध लढण्याची धाडस महाराजांनी तयार केले होते. याचेच पर्यावसान पुढे ब्रिटीशांविरुद्ध जिवट लढा देण्यात झाले.

आष्टीत घडुन आलेल्या संग्रामामुळे आष्टीची ओळख शहीद आष्टी या नावाने होऊ लागली. आष्टीत ब्रिटीश सत्तेच्या प्रतीक असलेल्या पोलिस टपाल व वनविभाग च्या शासकीय यंत्रणेला नेस्तनाभूत करण्यात आले. यामागे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या आवेशपूर्ण भजनांचा मुख्य वाटा आहे.

## प्रकरण ६ : यावलीचा स्वातंत्र्य संग्राम

विदर्भातील चिमूर, आष्टी या प्रमाणेच यावली येथे ही स्वातंत्र्य संग्राम घडुन आला. राष्ट्रसंताची जन्मभूमी असलेल्या यावली येथील जनतेत राष्ट्रप्रेम जागृत करण्याचे कार्य तुकडोजी महाराजांनी ज्या प्रभावशाली पद्धतीने केले त्याचे सविस्तर अध्ययन सदर प्रकरणात आढळून येते. स्वातंत्र्य प्राप्तीच्या आंदोलनात पुरुषांबरोबरच महिलांचीही सक्रिय भूमिका असल्याचे आपल्याला दिसून आढळते. महिलांना राष्ट्रीय कार्यात ओढून घेण्यास प्रवृत्त करण्यासाठी राष्ट्रसंताची महत्वपूर्ण भूमिका होती हे स्पष्ट होते.

## उपसंहार

संशोधन विषयासंबंधी केलेल्या सविस्तर अध्ययनाअंती राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या विदर्भातील भूमिक संदर्भात खालील निष्कर्ष निष्पन्न झाले.

१) तत्कालीन सामाजिक अनिष्ट रुढीं विरुद्ध राष्ट्रसंत तुकडोजींनी भजन-किर्तनाच्या माध्यमातून बंड पुकारलेत.

२) विशेष शैक्षणिक अर्हता नसून देखील शिक्षणाचे माहात्म्य तुकडोजींनी भारतीय जनतेला पटवून दिले.

३) खेडयांचा देश असलेल्या भारताकरिता स्वयंपूर्ण व स्वावलंबी ग्रामासंबंधी ग्रामगीतेतून आदर्शमय विचार मांडले.

४) महात्मा गांधीच्या प्रभावामुळे राष्ट्रसंतानी स्वतःला स्वातंत्र्य आंदोलनाच्या कार्यात जूळवून घेतले. परंतु भारतीय जनतेला प्रासंगिक साधनांच्या वापराला महत्व देत हिंसक साधनांच्या माध्यमाचा ही उपयोग करण्यास प्रोत्साहित केले. यातूनच चिमूर, आष्टी व यावलीत स्वातंत्र्य संग्राम घडून आला.

५) विदर्भीय महिलांना सामाजिक जागृती सोबतच राजकीय आंदोलनाविषयी जागृकता राष्ट्रसंतानी निर्माण केली.

६) तुकडोजी महाराजांच्या ग्रंथसंपदेची प्रासंगिकता वर्तमानकाळात देखील आहे.

७) राष्ट्रसंतानी आपले संपूर्ण जीवन समाज व राष्ट्रसेवेकरीता वाहून घेतले प्रसंगी तुरुंगवासही भोगला.

८) राष्ट्रसंत तुकडोली महाराजांचे कार्य केवळ विदर्भा पुरतेच मर्यादीत नसून संपूर्ण भारताशी संबधीत असल्यामुळे ते खऱ्या अर्थाने राष्ट्रसंत होते.

## संशोधनाचा आराखडा

प्रस्तूत विषयाचा संशोधन आराखडा पुढील प्रमाणे आहे.

### (A) संशोधनाची उद्दिष्टये

१) स्वातंत्र्य चळवळीतील राष्ट्रसंताच्या कार्याचे अध्ययन करणे.

२) ब्रिटीश कुटनितीपासून भारताला नेहमी सावध ठेवण्याकरिता राष्ट्रसंतानी केलेल्या कार्याचे अध्ययन करणे.

३) विदर्भातील चिमूर, आष्टी व यावली येथे झालेल्या स्वातंत्र्य संग्रामाचे अध्ययन करणे.

### (B) गृहीतकृत्य

१) राष्ट्रसंतानी खंजेरी भजनातून जनतेत राष्ट्रीय भावना निर्माण केली.

२) राष्ट्रसंतांनी भजनातून जनतेला व्यावहारीक ज्ञानाचा उपदेश दिला.

३) चिमूर, आष्टी व यावली या क्षेत्रातील जनतेला ब्रिटीश सत्तेचे खरे रुप उघड करुन दाखविले.

४) सामाजिक जागृती सोबतच राजकीय प्रबोधन राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी केले.

## (C) संशोधनाचे महत्व

प्रस्तूत संशोधन विषयाचे महत्व पुढील प्रमाणे आहे.

१) देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कार्यात सर्वसामान्य जनतेला राष्ट्रसंतानी एक छताखाली आणले.

२) राष्ट्रसंतानी भक्तीकार्याला राष्ट्रीयतेची जोड दिली.

३) राष्ट्रसंतानी भारतीय युवकांत जोम व जोश निर्माण करण्याकरिता भारतातील प्राचीन आदर्श त्यांच्या समोर ठेवली.

४) सर्वसामान्य जनतेला उपयुक्त ठरणारा ग्रामगीता हा ग्रंथ राष्ट्रसंतानी ग्रामासमोर ठेवला.

## संशोधन पद्धती

प्रस्तूत संशोधन विषयाकरिता प्राथमिक व द्वितीय स्त्रोत साधनांच्या माध्यमातून अध्ययन केले गेले. तसेच चिमूर, आष्टी व यावली येथील स्वातंत्र्य संग्रामात समाविष्ट झालेल्या क्रांतीकारकांच्या वंशजांच्या मुलाखती प्रत्यक्षात घेण्यात आले. राष्ट्रसंताची जन्मभूमी यावली शहीद येथे प्रत्यक्ष भेट देऊन ऐतिहासिक तथ्ये गोळा करण्यात आली. नागपूर येथील भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाला भेट देऊन तुकडोजी महाराजांच्या कारकिर्दिशी संबंधीत ऐतिहासिक दस्तऐवजांची जमवाजमव करुन अध्ययनाशी संबंधित माहिती संकलीत केली गेली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा गुरुकुंज आश्रम मोझरी येथे ही प्रत्यक्ष भेट देऊन ऐतिहासिक दस्तऐवजाचा चिकित्सक अध्ययन करुन माहिती संकलीत करण्यात आली.

**संशोधक**
**योगेश खेमराज भोयर**
सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग
न.मा.द. महाविद्यालय, गोंदिया
yogesh85bhoyar@gmail.com

**प्राचार्या**
न.मा.द. महाविद्यालय, गोंदिया